सीओईपी येथील करोना केंद्र बंद

१ जानेवारीपासून करोना रुग्ण भरती न करण्याचा निर्णय

पुणे : शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (सीओईपी) मैदानावरील मोठे करोना काळजी केंद्र बंद करण्यात येणार आहे. या केंद्रात येत्या शुक्रवारपासून (१ जानेवारी) नवे करोनाचे रुग्ण भरती करण्यात येणार नाहीत. करोनावरील उपचारांसाठी रुग्णांना महापालिकेच्या अन्य रुग्णालयांमध्ये भरती केले जाणार आहे.

शहरात करोना प्रादुर्भाव वाढल्यानंतर शासकीय आणि खासगी रुग्णालयांमधील खाटा कमी पडत होत्या. परिणामी सीओईपीच्या मैदानावर ८०० खाटांचे मोठे करोना काळजी केंद्र सुरू करण्यात आले होते. त्यामध्ये ६०० प्राणवायू आणि २०० अतिदक्षता (आयसीयू) खाटा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. मात्र, शहरातील करोनाचा प्रादुर्भाव कमी झाला आहे.

तसेच उपचार व अन्य खर्च वाढल्याने आता हे केंद्र बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या केंद्रात सध्या १५० करोना रुग्णांवर उपचार सुरू असून ते बरे होईपर्यंत हे केंद्र सुरू ठेवण्यात येणार आहे, तर १ जानेवारीपासून नव्या रुग्णांना उपचारांसाठी प्रवेश देण्यात येणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

याबाबत बोलताना विभागीय आयुक्त सौरभ राव म्हणाले, 'मोठे करोना काळजी केंद्र तात्पुरत्या स्वरूपात उभे करण्यात आले होते. पुणे महापालिकेचे नायडू, बाणेर-बालेवाडी येथील करोना समर्पित रुग्णालय, पिंपरी-चिंचवडमध्ये यशवंतराव चव्हाण रुग्णालय आणि ऑटो क्लस्टर येथील समर्पित रुग्णालय येथील रुग्णांची संख्या कमी होत आहे. या रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणात खाटा उपलब्ध आहेत. या पार्श्वभूमीवर १ जानेवारीपासून सीओईपी येथील करोना काळजी केंद्रात नव्या करोना रुग्णांना भरती न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.'

महाविद्यालये सुरू करण्याबाबत अद्याप अनिश्चितताच

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष अध्यापन सुरू होण्याबाबत अद्याप अनिश्चितताच आहे. महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठाकडून हालचाली सुरू करण्यात आल्या असल्या, तरी अद्याप त्याबाबत निर्णय झालेला नाही.

करोना संसर्गामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे. राज्यात नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्यास राज्य शासनाने मान्यता दिल्यामुळे महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक कामकाज सुरू करण्यासंदर्भातील चर्चा सुरू झाली. या पार्श्वभूमीवर पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात विद्यापीठाने व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीची बुधवारी बैठक झाली. या बैठकीत सध्या सुरू असलेली प्रवेश प्रक्रिया, प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिके, करोनाच्या नव्या प्रकाराच्या संसर्गाची शक्यता अशा विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. प्रथम सत्रातील प्रात्यक्षिकांचे काम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने महाविद्यालयात बोलवता येऊ शकेल का, या संदर्भातही आढावा घेण्यात आला.

समितीची ४ जानेवारीला पुन्हा एक बैठक होणार आहे. त्या बैठकीत एकूण परिस्थितीचा सर्वंकष आढावा घेऊन महाविद्यालये प्रत्यक्ष सुरू करण्याबाबत समितीच्या शिफारशी असलेला अहवाल कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना सादर करण्यात येईल. त्यानंतर कुलगुरूंकडून महाविद्यालये सुरू करण्याबाबतचा निर्णय जाहीर करण्यात येईल, अशी माहिती समिती सदस्यांनी दिली.

महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष अध्यापन प्रक्रिया सुरू करण्याबाबत प्राचार्यांकडून अनुकूलता दर्शवण्यात आली आहे. त्या संदर्भात वेळोवेळी प्राचार्यांशी संवाद साधून त्यांची मते विचारात घेण्यात आली. आता ४ जानेवारीला समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील निर्णय घेतला जाईल.

– डॉ. एन. एस. उमराणी, प्रकुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मार्चपर्यंत दहावीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे नियोजन

शिक्षण विभागाकडून दिनदर्शिका प्रसिद्ध

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील सर्व भागांतील शाळा अद्याप सुरू झाल्या नसल्या तरी दहावीचा अभ्यासक्रम मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन शिक्षण विभागाने केले आहे. पहिली ते दहावीच्या या सत्राची दिनदर्शिका शिक्षण विभागाने प्रसिद्ध केली आहे. अभ्यासक्रमातून वगळलेले भागही दिनदर्शिकेत समाविष्ट केल्यामुळे शिक्षक मात्र संभ्रमात आहेत.

नववी ते बारावीचे वर्ग काही भागांत सुरू झाले असले तरी राज्यातील अनेक भागांत वर्ग ऑनलाइनच भरत आहेत. ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष भरणाऱ्या वर्गांचे या सत्राचे नियोजन महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने तयार केले आहे. त्यानुसार पुढील दोन महिन्यांत दहावीचा सर्व अभ्यासक्रम पूर्ण होणे अपेक्षित आहे. दहावीच्या बहुतेक विषयांचे अध्यापन फेब्रुवारी अखेरीपर्यंत पूर्ण करून मार्चमध्ये वर्षभरातील उजळणी करण्याचे नियोजन विभागाने केले आहे.

'विद्यार्थ्यांना शिकवून झाले असले तरी ते त्यांना उमजले आहे का? हे ऑनलाइन वर्गातून पूर्णपणे कळू शकत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष शाळा सुरू करून विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन करणे, उजळणी, उत्तरपत्रिका सोडवण्याचा सराव करून घेणे आवश्यक आहे,' असेही मत शिक्षकांनी व्यक्त केले आहे.

'येत्या काळात शाळा सुरू झाल्यानंतर राहिलेले घटक शिकवणे, उजळणी घेण्यासाठी एका वेळी मर्यादित विद्यार्थ्यांनाच शाळेत बोलावणे शक्य आहे. त्यामुळे मार्चपर्यंत सर्व अभ्यासक्रम पूर्ण करण्याची दिनदर्शिका कशी पाळणार?' असा प्रश्न मुख्याध्यापकांनी उपस्थित केला आहे.

शाळांचा अभ्यासक्रम पूर्ण

शाळांनी मार्चपर्यंत अभ्यासक्रम पूर्ण करावा असे विभागाने सुचवले आहे, मात्र प्रत्यक्षात अनेक शाळांनी ऑनलाइन वर्गांच्या माध्यमातून जवळपास सर्व अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. एप्रिलमध्येच शाळांनी दहावीचे ऑनलाइन वर्ग सुरू केले होते. यंदा उन्हाळी सुट्टीही घेण्यात आली नाही. त्यात अभ्यासक्रमातील काही घटक कमी करण्यात आले.

वगळलेल्या पाठांमुळे संभ्रम

यंदा दहावीच्या अभ्यासक्रमातील काही पाठ वगळण्यात आले तर काही पाठांचा भारांश कमी करण्यात आला, मात्र विभागाने दिलेल्या दिनदर्शिकेत वगळण्यात आलेल्या पाठ्यघटकांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शिक्षक संभ्रमात आहेत. विशेषतः भाषा विषयातील वगळलेले घटक शिकवण्याची अपेक्षा दिनदर्शिकेत व्यक्त करण्यात आली आहे.

लशीसाठी प्रतीक्षाच!

(पान ३ वरून) लशीच्या आपत्कालीन वापरासाठी परवानगी देण्याची मागणी करणारे अर्ज फायझर कंपनीपाठोपाठ सीरम इन्स्टिट्यूट आणि भारत बायोटेक यांनी केले होते. भारत बायोटेक 'कोव्हॅक्सीन' नावाची लससनिर्मिती करत आहे. याआधी ९ डिसेंबरला समितीने अपुऱ्या तपशिलामुळे या कंपन्यांच्या अर्जावर निर्णय घेतला नव्हता. 'सीरम'ला संपूर्ण तपशील सादर करण्याची सूचना समितीने केली होती. तसेच 'भारत बायोटेक'ला समितीने तिसऱ्या टप्प्यातील चाचण्यांचा तपशील सादर करण्यास सांगितले होते.

त्यानंतर बुधवारच्या बैठकीतही लशींच्या परवानगीबाबत निर्णय न झाल्याने भारतीयांना लशींसाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. आता १ जानेवारीला होणाऱ्या समितीच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ब्रिटनची मात्र मान्यता

(पान ३ वरून) करू, असे ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी सांगितले. या लशीचे वितरण ४ जानेवारीपासून सुरू करण्यात येईल आणि त्यानंतरच्या काही आठवड्यांत लसीकरणाची प्रक्रिया वेगाने राबविण्यात येईल, असे ब्रिटनचे आरोग्यमंत्री मॅट हँकॉक यांनी सांगितले. ऑक्सफर्ड किंवा फायझर-बायोएनटेकच्या लशीची पहिली मात्रा मिळणाऱ्या व्यक्तीला १२ आठवड्यांत दुसरी मात्रा देण्यात येईल. सर्वांना लस मिळेल आणि करोनापासून दिर्घकालीन संरक्षणासाठी दुसरी मात्रा आवश्यक असेल, असे ब्रिटन सरकारने म्हटले आहे.

accelya

ॲक्सेलिया सोल्युशन्स इंडिया लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ॲक्सेलिया एनक्लेव, ६८५/२बी आणि २सी, १ला मजला, शारदा आर्केड, सातारा रोड, पुणे ४११०३७
दूरध्वनी: +९१-२०-६६०८३७७७ फॅक्स: +९१-२०-२४२३१६३९
ईमेल : accelyaindia.investors@accelya.com संकेतस्थळ : https://w3.accelya.com
सीआयएन : L74140PN1986PLC041033

सूचना

(कंपनीच्या समभागांच्या गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी (IEPF) निलंबन खात्याकडे हस्तांतरणासाठी)

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १२४ च्या अनुषंगाने सदस्यांना सूचना देण्यात आली असून, गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरीक्षण, हस्तांतरण व प्रस्ताव) नियम २०१, २०१६ च्या नियमासोबत वाचन केले गेले की आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी जाहीर केलेला अंतरिम लाभांश, जो सात वर्षांच्या कालावधीसाठी दावे न केलेला राहिला, आयईपीएफ मध्ये हस्तांतरणासाठी देय होईल. नियमानुसार ठरवलेल्या कार्यपध्दतीनुसार सलग सात वर्षे लाभांश हक्क न घेतलेला संबंधित शेअर्स देखील हस्तांतरित केला जाईल.

नियमांचे पालन करीत कंपनीने संबंधित भागधारकांना वैयक्तिकरित्या कळवले आहे आणि आयईपीएफकडे हस्तांतरित करण्यास जबाबदार अशा समभागांची माहिती कंपनीच्या वेबसाईटवर w3.accelya.com वर उपलब्ध करून देण्यात आली आहे. भागधारकांना वेबलिंक https://ris.kfintech.com/services/IEPF/IEPFUnpaidQry.aspx?q=%2fYRi1%2bG2efl%3d चा संदर्भ घ्या अशी विनंती केली आहे की विनाअनुदानित लाभांश आणि आयईपीएफमध्ये हस्तांतरित करण्यासंबधीचे समभाग पडताळणी करण्यासाठी.

संबंधति भागधारकांना २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या अंतरिम लाभांश १४ मार्च, २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी हक्क सांगण्याची विनंती केली जाते. आर्थिक वर्ष २०१३-१४ आणि आयईपीएफला पुढील सूचनेशिवाय मूलभूत समभाग

आयईपीएफकडे समभाग हस्तांतरित करण्याच्या उद्देशाने प्रत्यक्ष स्वरुपात समभाग असलेले आणि ज्यांचे शेअर्स आयईपीएफकडे हस्तांतरित करण्यास पात्र असतील अशा कंपनीचे समभागधारक नोंदवू शकतात अशा प्रकरणानंतर, कंपनी डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्रे डीमॅट फॉर्ममध्ये रुपांतरित करण्यासाठी आणि आयईपीएफच्या नावे हस्तांतरित करण्यासाठी कॉर्पोरेट कारवाई डिपॉझिटरीज सूचित करेल. मूळ भागधारकांना नावावर नोंदणीकृत मूळ सामायिक प्रमाणपत्र (स्वयंचलितपणे) रद्द होईल आणि आपोआप बोलण्यायोग्य समजले जाईल. डिमटेरियलाईज्ड स्वरुपात समभाग असलेले संबंधित भागधारक नोंदवू शकतात की कंपनी आयईपीएफच्या डिमॅट खात्याच्या बाजून समभागांच्या हस्तांतरणासाठी कॉर्पोरेट कारवाईद्वारे डिपॉझिटरीला सूचित करेल.

संबंधित भागधारक पुढे नमूद करु शकतात की वरील लिंकवरील उपलब्ध केलेला तपशील विचारात घ्यावा आणि आयईपीएफला समभाग हस्तांतरित करण्याच्या हेतूने कंपनीने डुप्लिकेट शेअर्स प्रमाणपत्र दिले असल्यास त्यास पुरेशी नोटिस मानली जाईल.

कृपया लक्षात घ्या की हक्क सांगितलेला लाभांश रक्कम आणि आयईपीएफकडे हस्तांतरित शेअर्सच्या संदर्भात कोणताही दावा कंपनीविरुध्द खोटे ठरणार नाही. नियमांतील विहित प्रक्रियेनंतर आयईपीएफ अधिकाऱ्यांकडून आयईपीएफकडे हस्तांतरित लाभांश व संबधित समभागधारक हक्क सांगू शकतात.

वरील बाबींसंदर्भात कोणत्याही चौकशीसाठी समभागधारकांना विनंती आहे की त्यांनी कंपनीचे निबंधक आणि समभाग हस्तांतरण एजंट मे. केफिन टेक्नॉलॉजीज प्रा.लि. (पूर्वीचे कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड) श्री मो. मोहसिनुद्दिन, वरिष्ठ व्यवस्थापक यांचेशी युनिट: ॲक्सेलिया सोल्युशन्स इंडिया लिमिटेड, टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गाचीबावली फायनॅन्शियअल डिस्ट्रीक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद – ५०० ०३२, टेली: ०४० ६७१६ १५५९ ईमेल आयडी : mohsin.mohd@kfintech.com येथे संपर्क साधावा.

ॲक्सेलिया सोल्युशन्स इंडिया लिमिटेड करिता
सही/-
निनाद उमराणीकर
कंपनी सचिव

ठिकाण : पुणे
दिनांक : ३०, डिसेंबर, २०२०

KIRLOSKAR FERROUS INDUSTRIES LIMITED
A Kirloskar Group Company
Registered Office: 13, Laxmanrao Kirloskar Road, Khadki, Pune - 411 003. (Maharashtra)
CIN: L27101PN1991PLC063223

Kirloskar
Enriching Lives

NOTICE

Notice is hereby given that the meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on **Monday, 25 January 2021** to consider, inter-alia, the Unaudited Financial Results of the Company for the quarter and nine months ending 31 December 2020.

This intimation is also available at the website of the Company www.kirloskarferrous.com and that of the BSE Limited www.bseindia.com

For Kirloskar Ferrous Industries Limited
sd/-
Mayuresh Gharpure
Company Secretary

Date: 30 December 2020
Place: Pune

• **Telephone:** (020) 66084645 • **Fax:** (020) 25813208
• **E-mail:** investor@kfil.com • **Website:** www.kirloskarferrous.com

Mark bearing word "Kirloskar" in any form as a suffix or prefix is owned by 'Kirloskar Proprietary Limited' and 'Kirloskar Ferrous Industries Limited' is the Permitted User.

- पुणे महानगरपालिका -
निविदा प्रक्रिया कक्ष
जाहिरात क्र. १/५८३, दिनांक ३०/१२/२०२०
निविदा विक्री कालावधी दिनांक- ३१/१२/२०२० ते ०८/०१/२०२१, वेळ- दुपारी २.३० पर्यंत.
निविदा स्वीकृती दिनांक- ३१/१२/२०२० ते ०८/०१/२०२१, वेळ- दुपारी २.३० पर्यंत.
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक- ११/०१/२०२१, दुपारी ४.०० वा.

पुणे Pune अद्वितीय & Unique

निविदा क्र.	खात्याचे नाव	कामाचे नाव	निविदा संच किंमत रुपये	अंदाजित पूर्वगणित रक्कम	बयाणा रक्कम रुपये	कामाची मुदत	निविदाविषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक
पीएमसी/ आरोग्य/ जन्म व मृत्यू/ २०२०-२०२१	आरोग्य विभाग जन्म व मृत्यू विभाग	सन २०२०-२१ सालासाठी आरोग्य खाते- जन्म-मृत्यू नोंदणी विभागाकरिता रजिस्टर बायडिंग स्कॅनिंग करणे व त्याची हार्डडिस्क तयार करणे.	४१५/-	८,९१,०००/-	८९१०/-	०२ महिने	डॉ. कल्पना बळीवंत, ०२०-२५५०१२२५

अ) पुणे म.न.पा.ची वरील कामे ही अनुभवी/ म.न.पा. मान्यताप्राप्त/ शासन मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून (कामासाठीच्या पूर्वगणन पात्रता अटी टेंडर सेटमध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामांबाबत निविदा अटी, शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून, सदर कामाचे निविदा संच ***www.mahatenders.gov.in*** या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून, सर्व निविदा बी-२ पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.

सही/-
(डॉ. कल्पना बळीवंत)
सहाय्यक आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

सही/-
(डॉ. आशिष भारती)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे
ई-निविदा मुदतवाढ

जा. क्र. १६/६२२५/२० दि. ३०/१२/२०२०

तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या मिळकतींचे स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत सौंदर्यीकरण करणे व त्या अनुषंगाने येणारी सर्व कामे करणे या कामाची ई-निविदा जावक क्र. ६०३४/२०, दिनांक १५/१२/२०२० रोजी *http://mahatenders.gov.in* या संकेतस्थळावर सदर कामाची ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती. या कामाकरिता अर्ज करण्याची तारीख १७/१२/२०२० ते २८/१२/२०२० पर्यंत होती. या कामाकरिता Bid Submission End Date २८/१२/२०२०, सायं. ०५:०० पर्यंत होती. आवश्यक निविदा प्राप्त न झाल्याने या निविदेस दिनांक ०७/०१/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. प्राप्त झालेल्या निविदांमधून सर्वप्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १ दिनांक ११/०१/२०२१ रोजी दुपारी १२:३० वाजता व वित्तीय बोलीचा लिफाफा दिनांक १२/०१/२०२१ रोजी दुपारी १२:३० वाजता उघडण्यात येईल.

सही/- व शिक्का
मुख्याधिकारी
तळेगाव दाभाडे नगरपरिषद

KOLTE • PATIL
Creation, not Construction

कोलते-पाटील डेव्हलपर्स लिमिटेड
(CIN: L45200PN1991PLC129428)
नोंदणीकृत कार्यालय : दुसरा मजला, सिटी पॉईंट, ढोले पाटील रोड, पुणे-४११००१.
दुरध्वनी क्रमांक :+९१ २० ६६२२६५००, फॅक्स क्र. :+९१ २० ६६२२६५११
Email : investorrelation@koltepatil.com website : www.koltepatil.com

पोस्टल बॅलट आणि दूरस्थ ई-मतदानाबाबत माहितीठी सूचना

कंपनीज ॲक्ट, २०१३(ॲक्ट) चे कलम ११० आणि असल्यास अन्य तरतुदी आणि त्यासह वाचल्या जाणा-या कंपनीज (व्यवस्थापन आणि प्रशासन) रूल्स, २०१४ जे वेळोवेळी अस्तित्वात आहेत (''रूल्स'') (कायदेशीर सुधारणा आणि फेर-अंमलबजावणी) सेबीचे रेग्युलेशन्स ४४ (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्), रेग्युलेशन्स २०१५ (''सेबी रेग्युलेशन्स''), सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४, १७, २२ आणि ३३/२०२० दिनांक अनुक्रमे ८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल २०२०, १५ जून २०२० आणि २८ सप्टेंबर २०२० जे कंपनी व्यवहार मंत्रालयाने (''एमसीए सर्क्युलर्स'') जारी केलेले परिपत्रक आणि अन्य लागू असलेले कायदे आणि नियम यांच्या अधीन राहून, कंपनीच्या सभासदांच्या पुढे नमूद करण्यात आलेला ठराव (आलेले ठराव) मंजूर करण्यासाठी पोस्टल बॅलेटव्दारे, दूरस्थ ई-मतदानामार्फत अनुमती घेण्यात येत आहे.

अनु क्र.	तपशील
१	कोलते-पाटील आयव्हेन टाऊनशिपस(पुणे) लिमिटेड, कंपनीची उप कंपनी व भागीदारी कंपनी (रिलेटेड पार्टी), ह्या उप कंपनी व भागीदारी कंपनीने घेतलेल्या कर्ज सुविधांकरिता कॉर्पोरेट हमी रू. २०० करोड पर्यंतची देणे.

एमसीए परिपत्रकांची पूर्तता करून, तपशील असलेले निवेदन (''नोटीस'') आणि पोस्टल बॅलटची सूचना गुरूवार, ३१ डिसेंबर २०२० रोजी, इलेक्ट्रॉनिक पध्दतीने अशा सभासदांना पाठविण्यात येत आहे की, ज्यांचे ई-मेल आयडी कंपनी डिपॉझिटरी पार्टीसिपंट (सिपंटस्) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत अणि ज्यांची नावे कट-ऑफ-डेटला म्हणजे शुक्रवार १८ डिसेंबर, २०२० रोजी रजिस्टर ऑफ मेंबर्स/रेकॉर्ड ऑफ डिपॉझिटरीज् यांच्याकडे आहेत.

सदर सूचना कंपनीचे संकेतस्थळ www.koltepatil.com सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लि. संकेतस्थळ www.evotingindia.com बीएसई लिमिटेड यांचे संकेतस्थळ www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लि. यांचे संकेतस्थळ www.nseindia.com येथेही उपलब्ध आहे. कट-ऑफ डेटला जी व्यक्ती सभासदर नाही, तिने ही सूचना फक्त माहितीच्या हेतूने आहे असे समजावे. सभासदांनी त्यांचा होकार अथवा नकार दूरस्थ ई-मतदानाव्दारे कळवावा.

सदर कायदयाचे सेक्शन १०८ आणि त्यासह वाचल्या जाणा-या सेबी रेग्युलेशन्स ४४ चे रूल २० मधील तरतुदींनुसार कपंनीने आपल्या सर्व सभासदांना दूरस्थ ई-मतदानाची सुविधा पुढे नमूद केलेल्या कालवधीत त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक पध्दतीने करण्यासाठी सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लि. यांची सेवा प्राप्त केली आहे आणि मतदानाचा कालावधी संपल्यानंतर ही पध्दती दूरस्थ ई-मतदानासाठी बंद होईल.

दूरस्थ ई-मतदान सुरू होण्याची तारीख आणि वेळ	गुरूवार ३१ डिसेंबर २०२० (सकाळी ९.०० वाजता, भारतीय प्रमाणवेळ)
दूरस्थ ई-मतदान संपण्याची तारीख आणि वेळ	शुक्रवार २९ जानेवारी २०२१ (सकाळी ५.०० वाजता, भारतीय प्रमाणवेळ)

कट-ऑफ-डेटला म्हणजे शुक्रवार १८ डिसेंबर २०२० रोजी ज्या सभासदांची नावे रजिस्टर ऑफ मेंबर्स/रेकॉर्ड ऑफ डिपॉझिटरीज् यांच्याकडे नोंदणीकृत आहे त्यांनाच फक्त दूरस्थ ई-मतदानाची सुविधा उपलब्ध होईल. एकदा सभासदाने मतदान केले की, त्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. जे सभासद कंपनीचे समभाग अप्रत्यक्ष पध्दतीत, प्रत्यक्ष पध्दतीत धारण करतात त्या सभासदांसाठी आणि ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल नोंदविलेले नाहीत, त्यांसाठी दूरस्थ ई-मतदान पध्दतीव्दारे मतदानाची तपशीलवार माहिती व सूचना या सूचनेचा एक भाग आहेत.

कंपनीच्या संचालक मंडळाने श्री. सुरेश देऊळकर (एफसीएस १३२१) आणि ते उपलब्ध नसल्यास श्री. श्रीधर मुदलियार (एफसीएस ६१५६) मे. एसव्हीडी ॲण्ड असोसिएट्स, प्रॅक्टीसिंग कंपनी सेक्रेटरीज यांची पारदर्शक पध्दतीने पोस्टल बॅलट प्रक्रिया (दूरस्थ ई-मतदानव्दारा) पूर्ण करण्यासाठी निरिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. दूरस्थ ई-मतदानाव्दारे करण्यात आलेल्या पोस्टल बॅलटचा निकाल (निरिक्षकांच्या अहवालासह) रविवार, ३१ जानेवारी २०२१ रोजी सायं. ५.०० पूर्वी (भारतीय प्रमाणवेळ) जाहीर करण्यात येईल. सदरचे निकाल कंपनीचे संकेतस्थळ www.koltepatil.com वर घोषित करण्यात येईल, त्याचबरोबर डिपॉझिटरीज्, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड आणि बीएसई लिमिटेड यांना कळविण्यात येईल.

पोस्टल बॅलेट आणि दूरस्थ ई-मतदानासंबंधी कोणतीही शंका वा समस्या असल्यास, सभासदांनी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा : श्री. विनोद पाटील, कंपनी सचिव आणि कंप्लायन्स अधिकारी, दुसरा मजला, सिटी पॉईंट, ढोले-पाटील मार्ग, पुणे-४११००१ . दूरध्वनी क्र. ०२०-६६२२६५००, फॅक्स क्र. ०२०- ६६२२६५११
ई-मेल पत्ता : investorrelation@koltepatil.com

ठिकाण : पुणे
दिनांक : ३१ डिसेंबर २०२०

कोलते-पाटील डेव्हलपर्स लि. करीता

सही /-
श्री. विनोद पाटील
कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स अधिकारी
मेंबरशिप नं. A13258

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

व्यवसाय

व्यवसायविषयक

शासकीय योजने अंतर्गत मसाले, गारमेंट, विविध फूड प्रक्रिया, पोल्ट्री, डेरी, शेळी फार्म, मत्स्य व्यवसायासाठी- 9920579060 मेहनती घरगुती गृहिणीसाठी रोज रोखीत व्यवसायासाठी- 9867934314.
0070725520-1

कर्जविषयक

प्रधानमंत्री जनधन योजनाअंतर्गत मुद्रा Future Finance समस्त लोन मात्र २४ तासांत, २% व्याज ५०% सूट महिलांसाठी. 8979596870, 8126257282.
0070725603-1

मालमत्ताविषयक

तळेगाव स्टेशनजवळ यशवंतनगर येथे बालाजी मंदीरासमोर १ बीएचके आणि २ बीएचके फ्लॅट्स उपलब्ध, भिडे लाइफस्टाईल वर्ल्ड. संपर्क- ८१०८११९८०३/ ८१०८११९८०४ RERA-P 52100026125
0090279328-1

visit us at WWW.LOKSATTA.COM

नवी मुंबई, मुंबई, पुणे, नासिक शहरात उपनगरात तयार प्लॉट बंगलो रो-हाऊस जमिनी खरेदी विक्री भाडे करारसाठी- 9175284426/ 9920579060.
0070725470-1

मुंबई, पुणे, नासिक, डहाणू जवळच डेव्हलप अनडेव्हलप फार्महाऊस प्लॉट. महाबळेश्वर, कोकण, गोव्यात विविध प्रॉपर्टीसाठी- 8855921341/ 8010059340.
0070725467-1

यात्रासहल

देशपांडे ट्रॅव्हल्स
अष्टविनायक दर्शन-जेजुरी-आळंदी-प्रतीबालाजीसह 3,251/-, 3 दिवस, शुक्रवारी
तुळजापूर-पंढरपूर-गाणगापूर-अक्कलकोटसह 3,251/-, 4 दिवस, गुरूवारी
गणपतीपुळे-पावस-डेरवण-रत्नागिरीसह 4,751/-, 4 दिवस, गुरूवारी
कोल्हापूर-ज्योतिबा-पन्हाळा-नरसोबाची वाडीसह 3,251/-, 3 दिवस, शुक्रवारी
9820962500
9819453043
8291046167
0251-2212655
www.deshpandetours.com
0070724661-9-1

श्री स्वामी समर्थ मठ, वसई आयोजित नर्मदा परिक्रमा यात्रा २१ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२१ (२० दिवस). संपर्क- 9930607550
0070725552-1

विनोद हॉलिडेज द्वारका-सोमनाथ- गिरनार- ७/२/२०२१, गोवा २२/०१/२०२१, २५/०२/२०२१, कोकणदर्शन- १६/०२/२०२१, मुरुडेश्वर - गोकर्ण- शिरसी- इडगुंजी २१/०१/२०२१, ९/०२/२०२१, बांधवगड- जबलपूर- २३/०२/२०२१, चित्तौडगड- माऊंटअबू- उदयपूर- २२/०२/२०२१, ९/०२/२०२१, हैद्राबाद- श्रीशैल्यम (रामोजीसह) १७/३/२०२१, सुंदरबन- कलकत्ता- १६/२/२०२१, आनंदवन- हेमलकसा- सोमनाथ- ताडोबा- २१/०१/२०२१, ९/०२/२०२१, बैंगलोर- उटी- मैसूर- २१/०३/२०२१, १८/०४/२०२१, सहल खर्चात सर्व बाबी समाविष्ट. संपर्क : ९३७२९१०४१४/ ९३७२४५३७६२.
0070691979-9

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग
दर रविवारी 'लोकसत्ता'तून
जीवनसाथी

विनोद हॉलिडेज राजस्थान (मेवाड- मारवाड) ३/२/२०२१, पुरी, भुवनेश्वर, कलकत्ता, गंगासागर ६/२/२०२१, नेपाळ- ५/३/२०२१, संपूर्ण हिमाचल ५/३/२०२१, केरळ- कन्याकुमारी १८/२/२०२१, श्री दत्त परिक्रमा १९/१/२०२१, नर्मदा परिक्रमा १९/०३/२०२१, मनाली- लेहलडाख ०२/०५/२०२१, चारधाम, उत्तराखंड २१/०५/२०२१, अमृतसर- काश्मिर- वैष्णोदेवी १४/०४/२०२१, अमृतसर- धरमशाला- डलहौसी १५/०५/२०२१, आसाम- मेघालय- अरुणाचल १९/०४/२०२१, सहल खर्चात सर्व बाबी समाविष्ट. संपर्क : ९३७२९१०४१४/ ९३७२४५३७६२.
0070691979-8

नावात बदल

I, Shadab Jamil Adhikari S/O SH. Jamil Ahmed Abdul Rehman Adhikari R/O D-702 Suyog Paradise, Inside Amba Vatika Soc, Nibm Road, Kondhwa, Pune 411048 Have changed My Name To Shadab Jamil Ahmed Adhikari For All Future Purposes.
0070725469-2

I, Sonia , spouse of Gulshna Rana, Resident of Bahmani, Gurdaspur, Punjab - 143532 have changed my name from Sonia to SONIA MANHAS vide Affidavit dt. 28/12/2020 before Jyoti Wadhwani ,Advocate andNotarypune
0090279842-1

We, Nimish Harshadrai Gandhi and Parul Nimish Gandhi have changed our minor son's name from Parva Nimish Gandhi to Parv Nimish Gandhi.
0070725574-1

I JC-731807W Subedar Virender Kumar Changed My Son's Name From Vikash Sharma to Vikas Sharma and Birth Date From 27/03/1997 to 06/11/1996 Affidavit-2538/2020 Dated: 17/12/2020
0090279829-1

I have changed my name after marriage from Bharati Sidhappa Gadkari to new name Pallavi Pandit Kumbhar vide Aadhar No. 622915310887
0090279833-1

I, Videya Kurkute spouse of No. 14833361W Rank Nk Name Murkute V. M. declares my wrong name Videya Kurkute corrected to Murkute Vidhya Vitthal vide Affidavit No. 3495/2020
0090279833-2

I Have Changed My Name From Tejes Sunil Salunke to